ePaper

# राज्यातील सत्तासंघर्षावर आज घटनापीठासमोर सुनावणी, काय होणार?




| वर्ष - 6 । अंक - 149 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





www.mahaenews.com | ।बुधवार ।दिनांक 7 सप्टेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



‘सर्व प्रश्नांवर ‘हिंदू विरुद्ध मुसलमान’ हाच उपाय त्यांच्याकडे आहे व लोक त्यास फशी पडत आहेत. आपली हजारो हेक्टर जमीन घशात घालणाऱ्या, सतत घुसखोरी आणि सीमेवर कुरबुरी करणाऱ्या चीनच्या विरोधात कधी पाकिस्तानप्रमाणे ललकारी देताना भाजपवाले दिसत नाहीत. चीनने अर्धे लडाख घशात घातले तरी ‘भारत जोडो’ वर चिखलफेक करणारे गप्प आहेत. त्यांचा राष्ट्रवाद, हिंदुत्व येथे थंड का पडते?

-उद्धव ठाकरे, शिवसेना

चंद्रकांत खैरेची त्याच्या वयानुसार बुद्धी भ्रष्ट झाली आहे. तो कुणाला चारित्र्यावरून बोलतोय, हे त्याला माहीत असायला पाहिजे. आतापर्यंत माझं रेकॉर्ड आहे, मी लव्ह जिहादमध्ये गुंतलेल्या २२२ मुली परत आणल्या आहेत. जी महिला आपल्या नवऱ्याकडे गऱ्हाणं सागू शकत नाही, त्या मोठ्या भावाप्रमाणे आम्हाला त्यांची गाऱ्हाणी सांगतात. याठिकाणच्या महिलांनी मला निवडणुकीत रक्ताचे शिक्के मारून प्रेम व्यक्त केलं होतं. हे चंद्रकांत खैरेला माहीत नसेल.

-संजय गायकवाड, आमदार



# पिंपरी-चिंचवडकर हाच विकासाचा केंद्रबिंदू!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा विश्वास : महायूती सरकारमध्ये विविध प्रकल्प मार्गी लागणार





गेल्या दोन वर्षांत कोविडचा त्रास सर्वांनाच सहन करावा लागला आहे. कोविडच्या संकटातून आपण बाहेर पडलो आहोत. हे संकट पुन्हा कोणाच्याच नागरिकांच्या आयुष्यात येऊ नये, हीच प्रार्थना मी गणरायाच्या चरणी केली आहे.

- महेश लांडगे, शहराध्यक्ष व आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड

### तुम्ही आरोप करा... आम्ही विकास करु..!

गेल्या दोन-तीन वर्षांत भाजपाच्या कारभारावर राष्ट्रवादीसह महाविकास आघाडीकडून आरोप केले जात आहेत. यावर बोलताना आमदार लांडगे म्हणाले की, विरोधकांना भ्रष्टाचाराचे आरोप करू द्या, आम्ही विकास करीत राहू. राज्यात अडीच वर्ष महाविकास आघाडीचे सत्ता होती. त्यांचे दोन मंत्री सध्या जेलमध्ये आहे. त्यामुळे आमच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप करण्याचा नैतिक अधिकार राष्ट्रवादीला नाही आणि असल्या आरोपांकडे आम्ही लक्षही देत नाही, अशी पुष्टीही लांडगे यांनी दिली.

**पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

राज्यात भाजपा-शिवसेना महायुतीचे सरकार आले आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवडमधील विकासकामांना निश्चितपणे चालना मिळेल. पिंपरी-चिंचवडकर हाच खरा विकासचा केंद्रबिंदू राहील, असा विश्वास भाजपाचे शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला. एका दैनिकाच्या पिंपरी-चिंचवड विभागीय कार्यालयातील गणेश दर्शन कार्यक्रमात आमदार लांडगे बोलत होते. यावेळी विविध विषयांवर लांडगे यांनी भाष्य केले. केंद्र आणि राज्यात भाजपचे सरकार असल्याने विकासकामात अडचण येणार नाही, असा दावाही लांडगे यांनी यावेळी केला आहे.


आमदार लांडगे म्हणाले की, विकासकामांच्या बाबतीत आमचा हेतू प्रामाणिक आहे. मागच्या अडीच वर्षात आम्हाला विकासकामे करताना खूप त्रास सहन करावा लागला. आमचे सरकार असताना आम्ही काम करताना कधीही भेदभाव केला नाही. शहरासाठी मागच्या पाच वर्षात ज्या योजना आणल्या, जी विकासकामे केली ती २० वर्षांपूर्वी होणे आवश्यक होते. आमच्यावर आरोप करणाऱ्यांनी हे लक्षात घ्याव की लोक आरोपाला नाही तर विकासाला मतदान करतात.

# श्वान दहन मशीनमध्ये बिघाड!

## अतिरिक्त आयुक्तांची माहिती : दि.7 ते 14 स्पटेंबरपर्यंत मशीन बंद

**पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

महापालिकेच्या चिरंतन भूमी नेहरूनगर येथील मृत श्वानांची विल्हेवाट लावणा-या दहन मशिनमध्ये (पेट इन्सिनेरेटर) बिघाड झाल्याने दि.७ सप्टेंबर ते १४ सप्टेंबर २०२२ या कालावधीत दुरुस्ती कामानिमित्त दहन मशीन बंद ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे यांनी दिली. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागामार्फत पाळीव प्राण्यांसाठी विविध सेवा सुविधा पुरविल्या जातात. श्वानांच्या वैद्यकीय उपचारासोबतच मृत श्वानांची विल्हेवाट लावण्याचे काम देखील या विभागामार्फात करण्यात येते. यासाठी महापालिकेच्या वतीने चिरंतन भूमी नेहरूनगर येथे मृत श्वानांचे विल्हेवाट लावण्याकरीता दहन मशिन कार्यरत आहे. या मशिनमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे मशिन दुरुस्त करण्यासाठी दि. ७ ते १४ सप्टेंबर या कालावधीत मशीन बंद ठेवण्यात



येणार आहे. या कालावधीमध्ये श्वान मालकांची गैरसोय होऊ नये यासाठी पर्यायी सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे. मृत श्वानांची विल्हेवाट लावण्यासाठी श्वान मालकांनी पुणे महापालिकेच्या हद्दीतील नायडू पॉन्ड, नायडू हॉस्पीटल मागिल बाजूस, ताडीवाला रोड येथील दहन मशीन चा वापर करण्याचे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. तसेच मृत श्वानांची विल्हेवाट लावण्यासाठी नियमानुसार शुल्क अदा करणे आवश्यक असल्याची माहिती पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अरुण दगडे यांनी दिली.

श्वान मनुष्य संघर्ष जनजागृती कक्ष आणि प्राण्यांबाबत नागरिकांच्या तक्रार निवारणासाठी तक्रार निवारण कक्ष उभारण्यात आले आहे. याठिकाणी आधुनिक पद्धतीने पाळीव प्राण्यांवर उपचार करण्यात येत आहे. नागरिकांनी मृत श्वानांची विल्हेवाट लावण्यासाठी पर्यायी सेवेचा वापर करावा.

- सचिन ढोले, उपायुक्त, पशुवैद्यकीय विभाग.

महापालिकेच्या वतीने शहरात प्राणी सुश्रुषा केंद्र स्थापन करून( ॲनिमल शेल्टर हाउस) भटक्या व पाळीव प्राण्यांसाठी आधुनिक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. प्राणी सुश्रुषा केंद्राच्या माध्यमातून भटक्या श्वानांसाठी प्रशस्त व सुविधायुक्त आंतररुग्ण विभाग निर्माण करण्यात आले असून याठिकाणी अनेक भटक्या श्वानांवर उपचार करण्यात येत आहे. तसेच पाळीव प्राण्यांसाठी सुसज्ज बाह्यरुग्ण विभाग देखील निर्माण करण्यात आला आहे.

याठिकाणी सोनोग्राफी, एक्स-रे सुविधा तसेच सर्व प्रकारच्या शस्त्रक्रियांसाठी आधुनिक व सुविधायुक्त दालन निर्माण करण्यात आले आहे.

# अमित शहा यांना मुंबई महापालिका निवडणूक तयारीसाठी यावे लागते हा शिवसेनेचा नैतिक विजय

## अंबादास दानवे यांचे वक्तव्य



। पुणे। महाईन्यूज ।

मुंबई महापालिकेवर ताबा घेण्यासाठी निवडणूक तयारीच्या दृष्टीने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना मुंबईत यावे लागते, हाच शिवसेनेचा नैतिक विजय आहे, अशी प्रतिक्रिया विधान परिषदेतील विरोधी पक्षनेता अंबादास दानवे यांनी सोमवारी येथे दिली. विधान परिषदेत विरोधी पक्षनेते झाल्यानंतर प्रथमच पुणे दौऱ्यावर आलेल्या अंबादास दानवे यांनी गणेशोत्सवानिमित्त शहरातील काही प्रमुख सार्वजनिक मंडळांना भेट दिली. विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांचीही त्यांनी भेट दिली. त्यानंतर पत्रकारांशी दानवे यांनी संवाद साधला.

दानवे म्हणाले, मंत्री उदय सामंत यांच्या गाडीवर शिवसैनिकांकडून हल्ला झाला, असे सांगण्यात आले होते. त्या वेळी अनेकांना अटक झाली. मात्र, या दडपशाहीला आम्ही घाबरत नाही. शिवसेना जमिनीवरच असून ते आकाशात आहेत. आम्ही त्यांना चांगले आकाश दाखवू. शिवसेना फक्त निवडणुकीसाठी काम करत नाही. आम्ही जनतेसाठी काम करतो, त्यामुळे आमचा मुंबईत विजय होईल, यात शंका नाही.

सन १९६६ पासून शिवाजी पार्कवर शिवसेनेचा दसरा मेळावा होत आहे. या वर्षीही शिवाजी पार्कवर शिवसेनेचाच दसरा मेळावा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली होईल, असे दानवे यांनी स्पष्ट केले.



# मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री आज पुणे दौऱ्यावर!

। पुणे। महाईन्यूज ।

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बुधवारी (७ सप्टेंबर) पुणे दौऱ्यावर येणार आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे शहरातील प्रमुख गणेश मंडळांना भेट देणार असून फडणवीस पुरंदर तालुक्यातील भिवडी येथील आद्यक्रांतीवीर राजे उमाजी नाईक यांच्या जयंती सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. कसबा पेठ, त्वष्टा कासार, तरूण अशोक मंडळ, दगडूशेठ हलवाई गणपती मंडळ, अखिल मंडई गणेशोत्सव मंडळ, तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, केसरीवाडा, यशवंतनगर गणेशोत्सव मंडळ, साई सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आदी गणेशमंडळांना एकनाथ शिंदे भेट देणार आहेत. अभिनेता नाना पाटेकर यांच्या निवासस्थानी जाऊन एकनाथ शिंदे गणेश दर्शन घेणार आहेत.उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे पुरंदर तालुक्यातील भिवडी येथील आद्यक्रांतीवीर राजे उमाजी नाईक स्मारकाला भेट देणार आहेत. त्यानंतर नाईक यांच्या जयंती सोहळ्यासही ते उपस्थित राहणार आहेत. एकनाथ शिंदे यांच्या पुणे दौऱ्यामुळे शिंदे गटाकडून जोरदार शक्तीप्रदर्शन होण्याची शक्यता आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे शहरातील प्रमुख गणेश मंडळांना भेट देणार असून फडणवीस पुरंदर तालुक्यातील भिवडी येथील आद्यक्रांतीवीर राजे उमाजी नाईक यांच्या जयंती सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत.

# राज्यात सर्वदूर मुसळधार पावसाची शक्यता

। पुणे। महाईन्यूज ।

राज्यात मोसमी पाऊस पुन्हा सक्रिय झाला असून कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भाच्या बहुतांश भागात मेघगर्जना, वादळी वाऱ्यांसह विजांच्या कडकडाटात मुसळधारांची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. बुधवारी राज्याच्या काही भागात मुसळधार पावसाने हजेरी लावली.

दक्षिण कर्नाटक भागात चक्रिय स्थिती, छत्तीसगड ते दक्षिण कर्नाटक दक्षिण कर्नाटक पार करून द्रोणीय स्थिती कार्यरत आहे. याबरोबरच बंगालच्या उपसागरात मध्यपूर्व भागात द्रोणीय स्थिती तयार झाली आहे. त्याचे रूपांतर ४८ तासात कमी दाबाच्या पट्ट्यात होणार आहे. या तिन्ही स्थितीमुळे देशाच्या काही भागासह राज्यात पुन्हा मान्सून सक्रिय झाला असून राज्याच्या सर्वच भागात वादळी वारे, मेघगर्जना



आणि विजांच्या कडकडाटासह मध्यम ते मुसळधार पाऊस पडणार असल्याचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तविण्यात आला आहे. दरम्यान, बुधवार ते शनिवार या कालावधीत रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, नगर, पुणे (काही भागांत मुसळधार), बुधवारी आणि गुरुवारी सांगली, सोलापूर, जालना, बीड, लातूर, उस्मानाबाद या जिल्ह्यांत, बुधवार ते शुक्रवार या कालावधीत हिंगोली, नांदेड, अकोला, अमरावती, भंडारा, चंद्रपूर (काही भागात मुसळधार), गोंदिया, नागपूर, वाशिम आणि यवतमाळ या जिल्ह्यांत, गुरुवारी आणि शुक्रवारी परभणी, शुक्रवारी आणि शनिवारी पालघर, ठाणे, मुंबई यांना मध्यम ते मुसळधार पावसाचा पिवळा इशारा देण्यात आला आहे.

# एक्झर्बिया अबोड गणेशोत्सव मंडळातर्फे आयोजित नृत्य स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## एकेरी व दुहेरीनृत्य प्रकार तसेच समूह नृत्याने रंगलेली ही स्पर्धा उपस्थित तरुणांचे आकर्षण ठरली

। वडगाव (मावळ)।
महाईन्यूज । गणेश क्षिरसागर।

जांभुळगाव येथील एक्झर्बिया अबोड गणेशोत्सव मंडळातर्फे विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून 5 सप्टेंबर रोजी नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. युवकांना मोठ्या उत्साहात थिरकायला लावणाऱ्या या नृत्य स्पर्धेमध्ये जुन्या व नवीन हिंदी मराठी चित्रपटांच्या गीतावर स्पर्धकांबरोबर विद्यार्थीप्रेक्षकही थिरकले. 'मल्हारी' पासून ' पिंगा ग पोरी पिंगा', 'उधळ उधळ' पासून चंद्रा, 'काला चष्मा' पर्यंत अनेक रंगतदार गीतांवर नृत्यकला सादर करण्यात आली. क्लासिकल, वेस्टन, रीमिक्स अशा विविध प्रकारच्या गीतांवर तरूणाईने मोठ्या उत्साहात



जल्लोष केला. एकेरी व दुहेरीनृत्य प्रकार तसेच समूह नृत्याने रंगलेली ही स्पर्धा उपस्थित तरुणांचे आकर्षण ठरली. धमाल नृत्याला मिळणारी तरुणाईची दाद आणि नृत्य सादरीकरणातील लक्षणीय पदलालित्याने एक्झर्बिया अबोडवासियांच्या चेहर्यावर कमालीचा उत्साह, आनंद पहायला मिळाला. सदर स्पर्धेला परिक्षक म्हणून काजल पुरी, रवीना वाणी, सोहेल शेख आदींनी आपले योगदान दिले. तर वडगाव मावळ येथील रमेशकुमार सहानी या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत इयत्ता दहावीत शिकत असलेली श्रद्धा कासार हिने खुमासदार सूत्रसंचालन करत प्रेक्षकांची मने जिंकली. स्पर्धेचा निकाल 8 सप्टेंबर रोजी सायंकाळी 8.30 वाजता जाहीर होणार असल्याचे गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष धनंजय वाणी, उपाध्यक्ष दीपक पाटील, खजिनदार पंढरीनाथ हिंगे, सतिश कदम, सचिन कासार यांनी सांगितले. या स्पर्धेत स्वरा, अनन्या, अनशुमन चव्हाण, धनश्री ससाणे, वेदांतका दिसले, गणपती बाप्पा मोरया ग्रुप, सिद्धी, आरोही, श्रृती कासार, रोशनी खेडकर, विणा भोरे, विहान भोरे आदींनी सहभाग नोंदविला. रचना-सपना यांनी ड्युएट नृत्याचे सादरीकरण केले. तर स्वरांजली पाखरे हिने अतिशय आत्मविश्वासपूर्वक नृत्य सादरीकरण केले.

### मिस्टर ॲण्ड मिसेस कदम यांचा झिंगाट परफॉर्मन्स

**धनश्री ग्रुपच्या 7 क्रू मेंबर्स, वेदांतिका दिसले हिने पिंगा या गाण्यावर केलेला बहारदार परफॉर्मन्स सर्वांच्याच कौतुकाचा विषय ठरला. प्रतिक्षा, रचना, सपना, अनुष्का, साक्षी पवार, सिद्धी बेतावडकर, विघ्नहर्ता ग्रुप, आदींनी नृत्य स्पर्धेला आपला सहभाग नोंदविला. एक्झर्बिया अबोडवासियांसाठी ओपन टू ऑल या कॅटेगरीत लहान-थोर, सर्वांनीच झिंगाट या गाण्यावर ठेका धरला. तर मिस्टर ॲण्ड मिसेस सतिश कदम यांनी झिंगाट परफॉर्मन्स सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.**

# बलशाली राष्ट्रासाठी हवी सद्भावना !

## सामाजिक ऐक्य कार्यक्रमात मान्यवरांची भावना : पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाचा पुढाकार

पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मानवी मूल्ये सर्वात श्रेष्ठ असून त्याची जपणूक करण्यासाठी आपसात सद्भावना निर्माण करणे गरजेचे आहे. त्यातून सक्षम, सुदृढ आणि एकसंघ राष्ट्राची निर्मिती होते. भारताला असेच बलशाली राष्ट्र बनविण्याकरीता प्रत्येकाने सद्भावना वृद्धींगत करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केला पाहिजे, असा सूर सामाजिक ऐक्य पंधरवडा निमित्ताने झालेल्या विशेष कार्यक्रमात उमटला.**



युवा व क्रीडा मंत्रालय भारत यांच्या निर्देशानुसार दिवंगत माजी पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांचा २० ऑगस्ट २०२२ हा जयंती दिवस सद्भावना दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागाकडून २० ऑगस्ट २०२२ ते ५ सप्टेंबर २०२२ या कालावधीत सामाजिक ऐक्य पंधरवडा साजरा करण्याच्या सूचना होत्या.

त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे सर्वधर्मीय सद्भावना विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास हिंदु धर्मजागरण संस्थेचे संयोजक माधव खोत, मौलाना कारी अब्दुल इकबाल, बौद्ध भन्ते धम्मानंदजी आणि शिख धर्मगुरू भाई दर्शनसिंग तसेच महापालिकेचे उप आयुक्त संदीप खोत, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनसंपर्क विभागाचे प्रफुल्ल पुराणिक,उपस्थित होते.

भन्ते धम्मानंदजी म्हणाले नागरिकांमधील कलह कमी करण्यासाठी परस्परांप्रती सद्भावना असणे गरजेचे आहे. प्रत्येकाने सर्वांशी माणुसकीने वागले पाहिजे, माणसातील द्वेष, वैरभाव दूर करून माणसाने माणसांशी विनम्रतेने वागले पाहिजे, संविधांनातील आधारभूत मानवी मुल्ये प्रत्येकाने जपावीत असे मार्गदर्शन केले.

भाई दर्शनसिंग म्हणाले सर्वांचे कल्याण व्हावे, सर्वजण सुखी समाधानी व सुरक्षित रहावे अशी गुरुनानक यांची शिकवण असून या आधारे सर्वांनी परस्परांबद्दलची भावना जोपासली पाहिजे असे ते म्हणाले.

भारतीय नागरिक परदेशी गेल्यानंतर त्यांची धर्मानुसार नव्हे तर भारतीय म्हणूनच ओळख होते. मानवता हीच सर्वश्रेष्ठ असुन सर्वांनी इतरांप्रती माणुसकी जपली पाहिजे, दिवाळी ईद सारख्या सणातून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश एकमेकांत दिला जातो अशा प्रकारे विविधतेने नटलेल्या या देशाचा अभिमान वाटतो असे मौलाना कारी अब्दुल इकबाल यांनी सांगितले.

### मतभेद संवैधानिक मार्गाने सोडवू...

**जात, वंश, धर्म, प्रदेश किंवा भाषा विषयक भेद न करता सर्व भारतीय जनतेचे भावनिक ऐक्य आणि सामंजस्य यासाठी आम्ही काम करू. आमच्यातील वैयक्तिक किंवा सामुहिक सर्व प्रकारचे मतभेद आम्ही हिंसाचाराचा अवलंब न करता विचार विनिमय करून संविधानिक मार्गानी सोडवू अशी प्रतिज्ञा सर्वांनी घेतली. जनसंपर्क विभागाचे प्रफुल्ल पुराणिक यांनी प्रतिज्ञाचे वाचन केले.**

### ...तर भारत वैभवशाली होईल !

**माधव खोत यांनी मार्गदर्शन करताना सर्वधर्मीय समाज टिकावा यासाठी सर्वधर्मियांनी एकत्र येणे गरजेचे असून आपापसात संवाद राखणे महत्त्वाचे आहे असे सांगितले. दोन धर्मांमध्ये जातीय वाद गैरसमजातून निर्माण होत असतात यासाठी देश डोळ्यासमोर ठेवून परस्परांशी समन्वय राखल्यास भारत वैभवशाली व समृद्ध होण्यास मदत होईल असे सांगितले.**

---

# शिक्षकांच्या हातून राष्ट्र घडवडण्याचे कार्य !

## आयुक्त शेखर सिंह : आदर्श शिक्षकांचा महापालिकेतर्फे गौरव

पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।



मानवजातीच्या दृष्टीकोनातून शिक्षकांचे स्थान महत्त्वपूर्ण असून विद्यार्थी घडवण्यासोबतच राष्ट्र घडवण्याचे आणि संस्कारक्षम पिढी निर्माण करण्याचे कार्य त्यांच्या हातून होत असते. त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी त्यांना पुरस्काराने सन्मानीत करणे हा आनंदी क्षण आहे, अशा शब्दांत मावळ लोकसभा मतदार संघाचे खासदार श्रीरंग उर्फ आप्पा बारणे यांनी शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर द्यावा तसेच विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील नात्यांची वीण अधिक घट्ट करावी, असे प्रतिपादन महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले.

शिक्षकदिनाचे औचित्य साधत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या वतीने चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहामध्ये आदर्श शाळा व गुणवंत शिक्षक अशा विविध पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी महापालिकेच्या शाळांमध्ये राबविण्यात येणाऱ्या पीसीएमसी पॅटर्नचे उद्‌घाटन करण्यात आले. महापालिका अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, शिक्षण विभागाचे उपआयुक्त संदिप खोत, क्रीडा विभागाचे उपआयुक्त विठ्ठल जोशी, प्रशासन अधिकारी संजय नाईकडे, सहायक प्रशासन अधिकारी रोहिणी शिंदे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षिका अनिता जोशी, पुणे महानगरपालिकेचे माजी महापौर दत्तात्रय गायकवाड,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रा. श्रीरंजन आवटे, आकांक्षा फाउंडेशनच्या संचालिका जयश्री ओबेरॉय, लीडरशिप फॉर इक्विटीचे मयुरेश भोईटे यांच्यासह पुरस्कारार्थी, शिक्षक आणि नागरिक उपस्थित होते.

यावेळी आदर्श शिक्षक आणि शाळांना पुरस्कार देण्यात आले यामध्ये आदर्श शिक्षिका उषा तापकीर, अलका बेलापूरकर, जयश्री गायकवाड, अपर्णा साळवी, सुजाता लोखंडे, वनिता नेहे, सविता माने, अरुणा महानवर, मंगल राऊत, शितल काकडे, कल्पना जाधव, अपर्णा ढोरे, शोभा टिळेकर, सुनिता शिंदे, माधुरी कुलकर्णी, दिव्या भोसले, हंसा लोहार, विद्याराणी वाल्हेकर, सुजाता श्रीसुंदर, आशा देशमुख, सुमंगल चोपडे, आशा निगडे, निता खाडे तसेच आदर्श शिक्षक संदीप वाघमारे, दत्तात्रय पवार, संतोष भोते, सुभाष कांबळे, राजू भगत, नवनाथ शिंदे, विजय लोंढे, विलास पाटील, राजेंद्र कांगुडे, विक्रम मोरे यांचा समावेश आहे. आदर्श शाळांमध्ये कुदळवाडी प्राथमिक शाळा क्र. ८९, जयवंत प्राथमिक शाळा भोईरनगर, माध्यमिक विद्यालय थेरगाव, यशस्वी माध्यमिक विद्यालय मोशी या शाळांना आदर्श शाळा पुरस्कार देण्यात आला. श्रीमती लिलाबाई कांतीलाल खिंवसरा, प्राथमिक शाळा मोहननगर, आकांक्षा फाऊंडेशन संचलित मनपा इंग्रजी माध्यमिक शाळा बोपखेल या शाळांना विशेष उल्लेखनीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. अन्नामृत फाऊंडेशन यांना सामाजिक कृतज्ञता पुरस्कार देण्यात आला.

> शिक्षक हे केवळ वेतनभोगी कर्मचारी नसून प्रसंगी ते विद्यार्थ्याच्या गुरुसह आई,वडील,भाऊ, बहिण अशा विविध भूमिका बजावत असतात. त्यातून ते विद्यार्थ्यांना घडवण्यासोबत त्यांच्या जीवनाला चांगला आकार देण्याचे कार्य करत असतात. शासनाने दिलेल्या जबाबदा-या देखील ते प्रामाणिकपणे पार पाडत असतात.
>
> **-श्रीरंग बारणे,** खासदार, मावळ.

## संपादकीय »

# पैसा : काळ्याचा पांढरा आणि पांढऱ्याचा सत्शील

*ऐंशीच्या दशकात जगाचे अर्थकारण झपाट्याने बदलू लागले. जागतिक व्यापाराला गती आली. जगातल्या डाव्या राजवटी कमकुमत होत गेल्या. औपचारिक अर्थकारणाबरोबरच अर्थकारणाचे अधोविश्वही फोफावू लागले.*

पैसा देशांच्या सीमा ओलांडून वाहतो, तेव्हा तो काळ्याचा पांढरा आणि पांढऱ्याचा सत्शील व सद्गुणी बनत जातो. अमेरिकेच्या लक्षात हा धोका पहिल्यांदा आला आणि तेथे काळ्या पैशाचे रूपांतर रोखण्याचा कडक कायदा आला. भारतात काळ्या पैशाच्या विरोधातला कायदा होता; मात्र मागच्या 'एनडीए' म्हणजे वाजपेयी सरकारने हा कायदा केला, तेव्हा असा कठोर कायदा भारतातही व्हावा, असे दडपण जगातून येत होते. ते चूकही नव्हते. त्यातून हा धनधुलाईला प्रतिबंध करणारा कायदा तयार करण्यात आला. आज या कायद्याची अंमलबजावणी करणारी सक्तवसुली संचालनालय ही यंत्रणा, म्हणजे 'ईडी' ज्या वेगाने आणि ताकदीने कामाला लागली आहे; त्यामुळे या कायद्याकडे साऱ्यांचे लक्ष गेले. त्यातूनच सर्वोच्च न्यायालयात 'पीएमएलए' म्हणजे 'प्रिव्हेन्शन ऑफ मनी लाँडरिंग ॲक्ट'ला आव्हान देणाऱ्या अनेक याचिका करण्यात आल्या. त्यात अनेक नामांकित याचिकादार होते. हा कायदा योग्य असून; त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्याला कोणत्याही प्रकारे बाधा येत नाही, असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिला आहे. या निकालामुळे केंद्र सरकारला मोठा दिलासा मिळाला आहे. या निकालाचे समर्थन करताना न्या. संतोष हेगडे यांच्यासारख्या नेक कायदेपंडिताने, 'एखाद्या कायद्याची अंमलबजावणी कशी होते किंवा निकाल कसे लागतात, यावर त्या कायद्याची प्रस्तुतता ठरत नाही,' असे म्हटले आहे.

सध्या सक्तवसुली संचालनालय सोनिया गांधी, पी. चिदंबरम, मेहबूबा मुफ्ती यांच्यासहित देशभरातील किती तरी नामांकित व्यक्तींवर या कायद्याखाली कारवाई करीत आहे. पश्चिम बंगालमध्ये गेल्या तीन दिवसांत जप्त झालेल्या रकमेचा आकडा ४० कोटी रुपयांच्या वर गेला आहे. याशिवाय, सोने; तसेच स्थावर मालमत्ताही सापडत आहेत. 'पीएमएलए' हा कायदा केवळ काळ्या पैशाच्या विरोधात नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. जगभरातला काळा पैसा हा अनेक मार्गांनी आधी अधोविश्वात आणि नंतर थेट दहशतवाद्यांच्या हातात जातो. काश्मीरमध्ये 'ईडी'ने केलेल्या कारवाया न्यायालयीन निकालांनी तडीस गेल्या, तर हा मुद्दा स्पष्ट होईल. सर्वोच्च न्यायालयात ही सुनावणी चालू असतानाच, संसदेत सरकारने जी माहिती दिली, ती पाहता नरेंद्र मोदी यांचे सरकार आल्यापासून 'ईडी'चे काम कित्येक पटींनी वाढले आहे.



## आनंदी सकाळ

# 'मातृदेवो भव'

पवित्रता ज्या त्यागाहून सहनशीलतेतून प्रकट होते, हे सर्वशील-चारित्र्याचे मूलभूत गुण व देवतुल्य मनोवृत्ती आहेत. म्हणून भारतीय सौंदर्यबोधही अशा उच्च गुणांनी युक्त आहे. जे शीलवान आहे, ते सुंदर आहे; कारण ते निष्कलंक आहे, शुद्ध आहे. म्हणूनच ते मोहक व अनुपम आहे. नारी-नारायणी रूप नैतिक सौंदर्याचा समुच्चय आहे. मातृरूप, मातृभाव या सौंदर्याचा सर्वोत्तम अनुभव आहे. पुत्र हा कुपुत्र होऊ शकतो; परंतु माता ही कधीच कुमाता होत नाही, असा दृढ विश्वास 'आई' या दोन अक्षरांत आहे. नारदाने भक्तीच्या एकादश आसक्तीत वात्सल्याचा अंतर्भाव केला आहे. संतांनी ईश्वरास, सद्गुरूस माऊली भावाने हाक मारली. 'मातृदेवो भव' ही सार्वकालिक आस्था आहे. भारतीयांनी याच मनोभूमिकेत मातृभूमीस 'आई'च्या उदात्त भावनेने स्वीकारले; त्यामुळे भारतीय अध्यात्म हे सतत सर्वोदय व राष्ट्रोद्धाराशी एकरूप आहे.

# उद्योजक अरविंद गोयल यांचा दानशूरपणा...






उत्तर प्रदेशातील मुरादाबाद येथील उद्योजक डॉ.अरविंद कुमार गोयल यांनी आपली संपूर्ण संपत्ती गरिबांसाठी दान केली आहे. या मालमत्तेची एकूण किंमत सुमारे 600 कोटी रुपये आहे. गोयल यांनी स्वत:कडे फक्त मुरादाबाद सिव्हिल लाईन्स इथलं एक घर ठेवलं आहे. 50 वर्षांच्या मेहनतीने त्यांनी हे साम्राज्य उभं केलं होतं.

गोयल यांनी थेट राज्य सरकारला देणगी दिली आहे. जेणेकरुन गरजूंपर्यंत मदत पोहोचू शकेल. उत्तर प्रदेश, राजस्थान, महाराष्ट्रासह अनेक राज्यांमधील 100 हून अधिक शैक्षणिक संस्था, वृद्धाश्रम आणि रुग्णालयांमध्ये ते विश्वस्त आहेत. कोविडमुळे लागू झालेल्या लॉकडाऊनच्या काळातही त्यांनी मुरादाबादची 50 गावं दत्तक घेऊन नागरिकांना मोफत अन्न आणि औषधं दिली होती.

कुटुंबाचाही निर्णयाला पाठिंबा

डॉ. गोयल यांच्या कुटुंबात पत्नी रेणू, दोन मुलं आणि एक मुलगी यांचा समावेश आहे. त्यांचा मोठा मुलगा मधुर गोयल मुंबईत राहतो. लहान मुलगा शुभम प्रकाश गोयल हा मुरादाबाद इथे राहतो आणि वडिलांना व्यवसायात मदत करतो. मुलगी लग्नानंतर बरेली येथे राहते. त्यांच्या या निर्णयाचे त्यांच्या मुलांनी आणि पत्नीने स्वागत केलं आहे.

...म्हणून संपत्ती दान करण्याचा निर्णय

डॉ. अरविंद कुमार गोयल यांनी सोमवारी (18 जुलै) रात्री संपत्ती दान करण्याची घोषणा केली. त्यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी सांगितलं की, "मी 25 वर्षांपूर्वीच माझी संपत्ती दान करण्याचा निर्णय घेतला होता." त्यावेळी घडलेल्या एका घटनेचा संदर्भ देत ते म्हणाले की, "डिसेंबरचा महिना होता. मी ट्रेनमध्ये चढताच एक गरीब माणूस थंडीने थरथर कापताना दिसला. त्याच्या पायात ना चप्पल होती, ना अंगावर चादर. त्याला पाहून माझं मन हेलावलं. मी स्वत:ला थांबवू शकलो नाही. मी माझे शूज काढले आणि त्याला दिले. मी काही वेळ सहन केले. पण कडाक्याच्या थंडीमुळे माझीही प्रकृती खराब होऊ लागली."


"त्या दिवशी मला वाटले की असे किती लोक थंडीने गारठत असतील. तेव्हापासून मी गरीब आणि निराधारांना मदत करण्यास सुरुवात केली. आता मी खूप प्रगती केली आहे. आयुष्यात काय घडेल सांगता येत नाही. त्यामुळे जीवंत असेपर्यंत संपत्ती योग्य हातात सुपूर्द केली. जेणेकरुन ही संपत्ती अनाथ, गरीब आणि निराधार लोकांसाठी वापरता येईल. मी जिल्हा प्रशासनाला माझी संपत्ती दान करण्यासाठी पत्र लिहिले आहे.

# धडे वगळण्याचा धडा!

**व्यापारी म्हणून आलेल्या इंग्रजांनी हिंदुस्थानावर वर्चस्व मिळवत इथली राजकीय सत्ता ताब्यात घेतली तेव्हा त्यांचा पहिला हल्ला हा शिक्षणावरच होता. त्यासाठी त्यांनी मॅकॉलेप्रणीत शिक्षणव्यवस्था लादली. त्यांनी हा प्रयोग भारतातच नाही तर इतरत्रही केला.**

उदाहरणार्थ दक्षिण आफ्रिका. त्यांनी कृष्णवर्णीयांसाठी निर्माण केलेल्या शिक्षणव्यवस्थेला 'बंटू एज्युकेशन' संबोधलं जातं. या बंटू शाळांमध्ये काळ्या विद्यार्थ्यांना जमिनीची नांगरणी, पेरणी, लाकूड कसं तोडायचं हे शिकवलं जायचं. त्यांच्या शिक्षणात विज्ञान, इतिहास, नागरिकशास्त्र या विषयांचा समावेश नव्हता.

मात्र आपले पूर्वज इंग्रजांपेक्षा हुशार होते. त्यांनी इथल्या ८० टक्के समाजाच्या कानावर शिक्षण हा शब्द पडणार नाही अशी संस्कृती निर्माण केली. महात्मा जोतीराव फुले यांनी सर्वप्रथम या समाजाच्या रोगाचं अचूक निदान 'अविद्या' हे केलं. यावरील जालीम औषध शिक्षण हेच आहे, हे सांगत ते कृतीद्वारे अमलातही आणलं. आता कुठं हा मुका समाज बोलू लागला आहे तर पुन्हा त्याला पूर्वावस्थेत नेण्याचा कृतिप्रवण कार्यक्रम सुरू झाला आहे. राष्ट्रीय शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या (एनसीईआरटी) १८२ पुस्तकांमध्ये केल्या गेलेल्या १,३३४ बदलांनी ही गोष्ट अधोरेखित झाली आहे. परिच्छेदच्या परिच्छेद वगळून, मोडतोड करून आणि प्रक्षिप्त मजकूर घुसडवून, विकृतीकरण करत अभ्यासक्रमाचं प्रचार साहित्यात रूपांतर केलं जात आहे.



एनसीईआरटीच्या सहावी ते १२ वीपर्यंतच्या विशेषत: इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र या विषयांच्या अभ्यासक्रमात २०१७ ते २०२२ या पाच वर्षांच्या काळात तीन वेळा हे बदल करण्यात आले. थोडक्यात आढावा घेतला तर असं दिसतं की आणीबाणीचा काळ, गुजरात दंगल यामधील मजकुरात बदल करण्यात आले. गुजरात दंगलीवरील दोन पाने, त्या संदर्भातील मानवी हक्क आयोगाचा अहवाल, तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांची टिपण्णी हे सगळं काढून टाकण्यात आलं आहे.

'राइज ऑफ पॉप्युलर मूव्हमेंट' या धड्यातील चिपको आंदोलन, शेतकरी आंदोलन, आंध्र प्रदेशातील दारूबंदी आंदोलन, महाराष्ट्रातील दलित पँथर चळवळ, नर्मदा आंदोलन, सातपुड्यातील आदिवासींनी अधिकारांसाठी केलेलं आंदोलन यांची माहिती काढून टाकण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना समाजाच्या सांस्कृतिक जाणिवेशी जोडण्याऐवजी तिच्यापासून अनभिज्ञ ठेवण्यासाठी शिक्षणाचा साधन म्हणून वापर केला जात आहे. या 'स्कूल'चा पायाच मुळी जॉर्ज ऑरवेल म्हणतो त्याप्रमाणे, 'अज्ञान हीच शक्ती' या सिद्धांतावर बेतलेला आहे. यातून 'की एलिमेन्ट्स ऑफ डेमोक्रेटिक गव्हर्मेन्ट' हा धडा वगळण्यात आला आहे. त्यात लोकशाहीचा विस्तृत परिचय करून देण्यात आला होता. तर 'डेमोक्रसी ॲण्ड डायव्हर्सिटी ॲण्ड चॅलेंजेस' हा धडाही वगळण्यात आला आहे.

## ।। अभंगवाणी ।।




आलिंगनें घडे ।
मोक्ष सायुज्यता जोडे ॥१॥
ऐसा संतांचा महिमा ।
जाली बोलायाची सीमा ॥ध्रु.॥
\- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### दसरा मेळाव्याबाबत उद्धव ठाकरेंचं मोठं विधान



। मुंबई । महाईन्यूज ।

गेल्या काही दिवसांपासून दसरा मेळाव्यावरून जोरदार चर्चा सुरू झाली आहे. दसरा मेळावा नेमका कुणाचा? यावरून दावे-प्रतिदावे सुरू आहेत. एकीकडे शिंदे गटाकडून बाळासाहेबांच्या हिंदुत्वाच्या विचारांचा दाखला देत दसरा मेळावा शिंदे गटाचाच होईल, असं सांगितलं जात असताना दुसरीकडे शिवसेनेकडून इतिहासाचा दाखला देत आजपर्यंत शिवसेनेचाच दसरा मेळावा होत आला आहे, असा दावा केला जात आहे. या सर्व घडामोडींवर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे मात्र अद्याप काही बोलले नव्हते. आता मात्र उद्धव ठाकरेंनी याबाबत मातोश्रीवर शिवसेना पदाधिकाऱ्यांशी चर्चा करताना आपली भूमिका मांडली आहे.

# "उद्धव ठाकरे तुम्ही पोराची काळजी घ्या"!

## डावा हातही तुरुंगात जाणार म्हणत किरीट सोमय्यांचा थेट इशारा

। मुंबई । महाईन्यूज ।



शिवसेना खासदार संजय राऊत मागील काही दिवसांपासून पत्राचाळ घोटाळ्याप्रकरणी न्यायालयीन कोठडीत आहेत. यानंतर आता माजी पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे हेही तुरुंगात जातील, असं सूचक विधान भाजपा नेते किरीट सोमय्या यांनी केलं आहे. उद्धव ठाकरे तुमचा उजवा हात तुरुंगात गेला आहे, आता डावा हातही तुरुंगात जाणार आहे, तुम्ही पोराची काळजी घ्या, असं विधान किरीट सोमय्यांनी केलं आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे.

भाजपा नेते किरीट सोमय्या हे आज पुण्यात आले होते. यावेळी त्यांनी पुण्यातील कसबा गणपतीचं दर्शन घेतलं. यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी प्रतिक्रिया देताना किरीट सोमय्या म्हणाले की, "गेल्यावेळी गणरायाचं दर्शन घेताना मी तुरुंगात जात होतो, आज संपूर्ण महाराष्ट्र तुरुंगातून बाहेर आला आहे, म्हणून गणपतीला धन्यवाद दिला. महाराष्ट्राला विकासाच्या पथावर घेऊन जाण्याची शक्ती दे, अशी प्रार्थना केली."

यावेळी किरीट सोमय्या यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि शिवसेना नेते आदित्य ठाकरेंवर टीकास्त्र सोडलं आहे. टीका करताना सोमय्या म्हणाले की, "ज्यादिवशी महाराष्ट्रातील ठाकरे सरकार कोसळलं, त्यादिवशी महाराष्ट्रावरील अमंगल संपलं. आता स्वयं एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस महाराष्ट्रात मंगलमय दिवस आणत आहेत. उद्धव ठाकरे यांच्या माफीया सरकारला महाराष्ट्रातील जनतेनं कायमचं रवाना केलं आहे."

किरीट सोमय्या पुढे म्हणाले की, "उद्धव ठाकरे, तुमचा उजवा हात तुरुंगात गेला आहे, आता डावा हातही तुरुंगात जाणार आहे, तुम्ही तुमच्या पोराची काळजी घ्या. आज दुपारी महापालिकेनं आदित्य ठाकरे आणि अस्लम शेख यांच्या मढ येथील १००० कोटींच्या स्टुडीओ घोटाळ्याची चौकशीची घोषणा केली आहे. त्यात पर्यावरण मंत्रालयाने बेकायदेशीरपणे १ हजार कोटी रुपयांचा घोटाळा केला आहे, हे सिद्ध होणार आहे. त्यामुळे ठाकरेंनी स्वत: च्या मंगलाची काळजी करावी, असा थेट इशारा सोमय्या यांनी दिला आहे.

# आधी एकनाथ शिंदे 'शिवतीर्थ'वर, आता राज ठाकरे 'वर्षा'वर, चर्चांना उधाण!

## राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण

। मुंबई । महाईन्यूज ।



**राज ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्यात चर्चा**

**आज राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी जाऊन गणपतीचं दर्शन घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. यावेळी राज ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्यात चर्चा झाली का? किंवा काय बोलणं झालं? याबाबतची कोणतीही अधिकृत माहिती अद्याप समोर आली नाही.**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सहकुटुंब मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी जाऊन गणपती बाप्पाचं दर्शन घेतलं आहे. ते सुमारे ४० मिनिटं मुख्यमंत्र्यांचं शासकीय निवासस्थान असणाऱ्या 'वर्षा' बंगल्यावर होते. यापूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही राज ठाकरेंच्या 'शिवतीर्थ' या निवासस्थानी जाऊन गणपतीचं दर्शन घेतलं होतं. आज राज ठाकरे मुख्यमंत्र्यांच्या घरी गणपतीच्या दर्शनाला आल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे.

काही वेळापूर्वीच राज ठाकरे आपल्या कुटुंबासह मुख्यमंत्र्यांचं शासकीय निवासस्थान 'वर्षा' बंगल्यावर दाखल झाले होते. यावेळी त्यांच्यासोबत पत्नी शर्मिला ठाकरे, मुलगा अमित ठाकरे होते. याशिवाय मनसे आमदार राजू पाटील, नितीन सरदेसाई हेही असल्याची माहिती मिळत आहे. राज ठाकरे वर्षा बंगल्यावर जवळपास ४० मिनिटं होते. एकनाथ शिंदे आणि राज ठाकरे यांची जवळीक वाढत असल्याने विविध तर्क वितर्क लावले जात आहेत. खरं तर, राज ठाकरे यांच्या 'शिवतीर्थ' निवासस्थानी दीड दिवसांचा गणपती बसवण्यात आला होता. गणपतीच्या आगमनाच्या दुसऱ्या दिवशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज ठाकरेंच्या घरी जाऊन गणरायाचं दर्शन घेतलं होतं. यावेळी एकनाथ शिंदे आणि राज ठाकरे यांच्यात सुमारे ४५ मिनिटं चर्चा झाल्याची माहिती समोर आली होती. आगामी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी शिंदे गट आणि मनसे यांच्यात युतीसंदर्भात यावेळी चर्चा झाली असावी, असे तर्क लावण्यात आले होते. त्याचबरोबर दसरा मेळाव्यावरून शिंदे गट आणि ठाकरे गटात सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी शिंदे गटाच्या दसरा मेळाव्यास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती दर्शवावी, याबाबत चर्चा झाल्याचीही माहिती समोर आली होती. यानंतर आज राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी जाऊन गणपतीचं दर्शन घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे.

# "बारामती लोकसभेचा गड उद्ध्वस्त करू"!

## बावनकुळेंच्या टीकेवर राष्ट्रवादीचा हल्लाबोल



। मुंबई । महाईन्यूज ।

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी (६ सप्टेंबर) बारामती दौऱ्यावर आले असताना बारामती लोकसभेचा गड उद्ध्वस्त करू, असं वक्तव्य केलं. यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते रविकांत वरपे यांनी जोरदार हल्ला चढवला आहे.

"ज्यांना जनतेतून निवडून येता आलं नाही त्यांनी बारामती लोकसभेचा गड उद्ध्वस्त करण्याची भाषा करू नये," असा टोला रविकांत वरपे यांनी लगावला. तसेच त्यांनी आधी जनतेतून निवडून यावं, असं आव्हानही त्यांनी दिलं.

रविकांत वरपे म्हणाले, "निर्मला सीतारमन बारामती दौऱ्यावर येत आहेत. आज भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे बारामती दौऱ्यावर आहेत. ते म्हणाले बारामतीचा गड आम्ही उद्ध्वस्त करणार आहे. ज्या बावनकुळेंना साधं विधानसभेचं तिकीट मिळालं नाही, जनतेतून निवडून येता आलं नाही, त्यांना विधान परिषदेवर जावं लागलं. तेच आज बारामती जिंकण्याची भाषा करत आहेत." "निर्मला सीतारमन देशाच्या अर्थमंत्री आहेत.

# गणवेश असलेल्या शाळेत धर्मस्वातंत्र्याचा मुद्दा ग्राह्य आहे का?

## सर्वोच्च न्यायालयाचा प्रश्न

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

तुम्हाला कोणत्याही व्यक्तीला धर्माचे पालन करण्याचा अधिकार आहे. मात्र, विद्यार्थी शाळेत कोणतेही कपडे घालू शकतात का? शाळेत धार्मिक गोष्टी बाजूला ठेवल्या जाऊ नयेत का?, असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांना सोमवारी उपस्थित केला आहे.

हिजाब प्रकरणावर कर्नाटक उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरूद्ध सर्वोच्च न्यायालयात २३ याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. याची सुनावणी न्यायमूर्ती हेमंत गुप्ता आणि न्यायमूर्ती सुधांशू धुलिया यांच्या खंडपीठासमोर पार पडली. तेव्हा सर्वोच्च न्यायालयाने ही टिप्पणी केली आहे. यावेळी न्यायालयाने म्हटलं की, विद्यार्थी मिनीज, मिडीज किंवा जे हवे ते कपडे घालून येऊ शकतात का? तुमच्याकडे धार्मिक हक्क असतील, पण हा हक्क तुम्ही शाळेचा गणवेश घालण्यास सांगणाऱ्या शैक्षणिक संस्थेत नेऊ शकता का? तुम्हाला हिजाब किंवा स्कार्फ घालण्याचा अधिकार असू शकतो. पण, गणवेश घालण्यास सांगणाऱ्या शैक्षणिक संस्थेत तुम्ही हा अधिकार घेऊन जाऊ शकता का?, असा प्रश्नही सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांना विचारला आहे. याप्रकरणाची पुढील सुनावणी ७ सप्टेंबरला होणार आहे.



**न्यायालयाने म्हटलं की, विद्यार्थी मिनीज, मिडीज किंवा जे हवे ते कपडे घालून येऊ शकतात का? तुमच्याकडे धार्मिक हक्क असतील, पण हा हक्क तुम्ही शाळेचा गणवेश घालण्यास सांगणाऱ्या शैक्षणिक संस्थेत नेऊ शकता का? तुम्हाला हिजाब किंवा स्कार्फ घालण्याचा अधिकार असू शकतो. पण, गणवेश घालण्यास सांगणाऱ्या शैक्षणिक संस्थेत तुम्ही हा अधिकार घेऊन जाऊ शकता का?, असा प्रश्नही सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांना विचारला आहे.**

## शॉर्ट न्यूज »

### काँग्रेसमधील अंतर्गत वाद पुन्हा चव्हाट्यावर



।नवी दिल्ली। महाईन्यूज । प्रतिनिधी।

सचिन पायलट अशोक गेराजस्थानमध्ये २०२३ साली विधानसभा निवडणुका होणार आहेत. त्यामुळे राजकीय हालचालींना वेग आला आहे. मात्र, काँग्रेसमधील अंतर्गत वाद थांबण्याची चिन्हे दिसत नाही आहे. काँग्रेसचे नेते तथा राज्याचे माजी उपमुख्यमंत्री सचिन पायलट यांनी पुन्हा एका मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांच्यावर निशाणा साधला आहे.

सचिन पायलट यांच्या ४५ व्या वाढदिवसानिमित्त कार्यकर्त्यांनी त्यांची भेट घेत शुभेच्छा दिल्या. तेव्हा कार्यकर्त्यांना संबोधित करताना पायलट यांनी म्हटलं की, "अशोक गेहलोत आणि मी एकमेकांचं समर्थन करत नाही आहे. मग, त्यांनी एकमेकांवर चिखलफेक सुद्धा करू नये.

## जम्मू-काश्मीरमध्ये 2 दहशतवाद्यांना ठार करण्यात भारतीय जवानांना यश



। ।मुंबई ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

दोन दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात भारतीय जवानांना यश आले आहे. जम्मू-काश्मीरच्या अनंतनागमध्ये सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक सुरू आहे. या चकमकीत भारतीय जवानांनी केलेल्या संयुक्त कारवाईत 2 दहशतवाद्यांचा खात्मा केला आहे. भारतीय जवानांनकडून मारले गेलेल्या दहशतवाद्यांची ओळख पटली आहे. दानिश भट उर्फ कोकाब दुरी आणि बशारत नबी अशी या दहशवाद्यांची नावे आहेत. हे दोघेही प्रतिबंधित दहशतवादी संघटना हिजबुल मुजाहिद्दीनशी संबंधित होते. हे दोघेही 9 एप्रिल 2021 रोजी सलीम या टीए कर्मचारी आणि 29 मे 2021 रोजी दोन नागरिकांच्या हत्येमध्ये सामील होते. मिळालेल्या माहितीनुसार, अनंतनाग जिल्ह्यातील पोशक्री भागात दहशतवादी असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर भारतीय जवानांनी घेराबंदी करून दहशतवाद्यांची शोधमोहीम सुरू केली. त्यावेळी या शोध मोहिमेवेळी दहशवादी आणि भारतीय जवान यांच्यात चकमक झाली असून दहशतवाद्यांकडून गोळीबार करण्यात आला. त्याला प्रत्युत्तर देताना दोन दहशतवाद्यांचा खात्मा झाला आहे. सोमवारी दहशतवाद्यांनी अनंतनागच्या इमामसाहेब भागात एसओजी कॅम्पवर हल्ला केला होता. रात्री उशिरा दहशतवाद्यांनी एसओजी कॅम्पला लक्ष्य करत गोळीबार केला. जवानांच्या प्रत्युत्तरानंतर दहशतवाद्यांनी अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पळ काढला. घटनेनंतर लगेचच संपूर्ण परिसराची नाकाबंदी करून शोधमोहीम सुरू करण्यात आली. या हल्ल्यात कोणालाही इजा झालेली नाही.


---

# नाकावाटे देण्यात येणाऱ्या करोना लसीला केंद्र सरकारने मंजुरी

## केंद्रीय आरोग्य मंत्री मनसुख मांडविया यांनी ट्विट करत ही माहिती दिली

।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

देशात करोनाचा हाहाकार कमी झाला आहे. मात्र, करोना विरोधातील लसीकरण मोहिम अद्यापही सुरू आहे. देशात मोठ्या प्रमाणात लसीकरण करून जनतेला करोनापासून सुरक्षित केलं जात आहे. त्यात करोना लसीबाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. ड्रग्ज कंट्रोलर जनरल ऑफ इंडियाने 'भारत बायोटेक'च्या नाकावाटे देण्यात येणाऱ्या लसीला आपत्कालीन वापरासाठी मंजुरी दिली आहे.



केंद्रीय आरोग्य मंत्री मनसुख मांडविया यांनी ट्विट करत ही माहिती दिली आहे. "भारताच्या करोना विरुद्धच्या लढ्याला मोठं यश मिळालं आहे. भारत बायोटेकच्या नाकावाटे देण्यात येणाऱ्या लसीला ड्रग्ज कंट्रोलर जनरल ऑफ इंडियाने आपात्कालीन परिस्थितीत वापर करण्यासाठी मंजुरी दिली आहे. १८ वर्षावरील सर्वांना ही लस देता येणार असून, करोना विरूद्धच्या आमच्या लढ्याला आणखी मजबूत करणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात भारताने करोना विरोधातील लढ्यात विज्ञान, संशोधन आणि मानवी संसाधनांचा उपयोग केला. पंतप्रधानांचे नेतृत्व, विज्ञावर आधारित दृष्टीकोन आणि सबका प्रयासने आम्ही करोनावर मात करू," असेही आरोग्यमंत्री मांडविया यांनी म्हटलं.

# बंगरुळुत पावसाचा हाहाकार!

। बंगळुरु ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

गेल्या काही दिवसांपासून बंगळुरुत पावसाने थैमान घातलं आहे. मुसधार पावासामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. मात्र, या पावसाचा सगळ्यात मोठा फटका बंगरुळुतील आयटी कंपन्यांना बसला आहे. एका दिवसात आयटी कंपन्यांच तब्बल २२५ कोटी रुपयांच नुकसान झालं आहे. द आऊटर रिंग रोड कंपनीज असोसिएशनने (ORRCA) कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांना याबाबत एक पत्र लिहीले आहे.

ORRCA हे आऊटर रिंग रोड (ORR) मार्गावरील सर्व प्रमुख आयटी आणि बँकिंग कंपन्यांचे प्रतिनिधित्व करणारे आयटी फर्म आहे. जवळपास पाच लाखांच्या घरात कर्मचारी या फर्ममध्ये काम करतात.



## आयटी कंपन्यांचे 'मोठा' फटका, एका दिवसात 225 कोटी रुपयांचे नुकसान

### आयटी कंपन्यांना मोठा फटका

मुसळधार पावासमुळे बंगरुळुतील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी साठले आहे. परिणामी वाहतुकींची कोंडी होऊन कर्मचारी वेळेत कामावर पोहोचू शकले नाही. त्यामुळे एका दिवसात आयटी कंपन्यांना २२५ कोटी रुपयांचा फटका बसला आहे. रस्त्यांवर पाणी साचल्यामुळे आयटी कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांना मोठ्या समस्यांचा सामना करावा लागत आहे. पाण्यामुळे इतर वाहने त्या भागात जाऊ शकत नसल्यामुळे ट्रॅक्टर आणि नावेच्या मदतीने आयटी कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांना ऑफिस गाठावे लागत आहे. याबाबतचा व्हिडिओही सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

# रणबीर-आलियाच्या 'ब्रह्मास्त्र' चित्रपटाने ॲडव्हान्स बुकिंगच्या बाबतीत 'या' हिट चित्रपटाला मागे टाकले



आलिया भट्ट आणि रणबीर कपूरचा 'ब्रह्मास्त्र' हा बहुप्रतिक्षित चित्रपट येत्या शुक्रवारी प्रदर्शित होणार आहे. हा चित्रपट प्रदर्शित होण्याची सगळे प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत. या चित्रपटासाठी जवळपास ३०० कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. या चित्रपटाचे तीन भाग असणार आहेत. या चित्रपटाच्या ट्रेलरलाही तुफान प्रतिसाद मिळाला. मात्र लालसिंग चड्ढाप्रमाणे 'बॉयकॉट ब्रह्मास्त्र' हा ट्रेंड देखील काही दिवसांपासून सोशल मीडियावर चर्चेत आहे.या चित्रपटाच्या प्रमोशनसाठी रणबीर कपूर आलिया भट अनेक ठिकाणी जात आहेत. 'ब्रह्मास्त्र' चित्रपटाची ॲडव्हान्स बुकिंग गेल्या शुक्रवारपासून सुरू झाले आहे. यानंतर शनिवारी सामान्य आणि थ्रीडी शोचेही बुकिंग करण्यात आले. मीडिया रिपोर्ट्सनुसार,'ब्रह्मास्त्र'च्या प्रदर्शित होण्याऱ्या दिवसाची दीड लाखांहून अधिक तिकिटे विकली गेली आहेत. त्याच वेळी, या चित्रपटाने ॲडव्हान्स बुकिंगमधून ५.४६ कोटी रुपयांची कमाई केली आहे. त्याच वेळी, जर यात ब्लॉक सीट्स जोडल्या गेल्या तर चित्रपटाने ७.६७ कोटी रुपयांची ॲडव्हान्स बुकिंग केले जाई.

# "तो अगदी त्याच्या वडीलांसारखा..."

## अभिनेत्री करीना कपूरने लाडक्या तैमुरबद्दल शेअर केली खास गोष्ट



अभिनेत्री करीना कपूर खान ही नुकतीच आमिर खानच्या 'लाल सिंग चड्ढा' या चित्रपटात झळकली. चित्रपट चांगलाच आपटला. आमिर आणि करीनाने काही वर्षांपूर्वी केलेली वक्तव्यं कारणीभूत ठरली असं काही तज्ञांचं मत आहे. करीना ही सोशल मीडियावर बऱ्यापैकी सक्रिय असते. तिचे फोटोज ती शेअर करत असते. गरोदर असतानाचेसुद्धा तिचे बरेच फोटो व्हायरल झाले होते. तैमुर पाठोपाठ नुकताच जेहचा जन्म झाला आणि करीना पुन्हा चर्चेत आली. सैफशी केलेलं लग्न असो, मूल झाल्यानंतर असो किंवा त्या मुलांची नावं ठेवण्यावरून असो, करीना कायम चर्चेचा विषय होती आणि तिला सोशल मीडियावर यावरून प्रचंड ट्रोल केलं जातं. एका मुलाखतीमध्ये नुकतंच करीनाने तैमुरचं तोंडभरून कौतुक केलं आहे. ती म्हणते, "तैमुरलाही त्याच्या वडीलांसारखं व्हायचं आहे. ते दोघे एकत्र पायरेट्स ऑफ कॅरिबियन, स्टार वॉर्स सारखे चित्रपट आणि वेबसीरिज बघतात. तैमुर हा सैफवरच गेला आहे. ते दोघे मिळून नेहमीच मला एकटं पडतात. तैमुरची समज खूप चांगली आहे तसंच त्याचं भवितव्यही उज्वल आहे. जेव्हा त्याला एखादी चुकीची गोष्ट करण्यापासून रोखलं जातं तेव्हा त्याला ती पटकन समजते. तो त्याच्या वयाच्या मानाने फार समजूतदार आहे." पुढे करीना म्हणते, "तैमुर आणि जेह दोघेही अत्यंत खोडसर आहेत. अर्थात येणाऱ्या काळात त्यांच्यात आणखीन उत्तम बदल घडतील, यावयातच त्याचं चित्रपटाविषयी असलेली समज उत्तम आहे. वीकएंडला तो त्याचा आवडीचा चित्रपट बघतो, अर्थात तो स्क्रीनसमोर जास्तवेळ बसणार नाही याची मी आणि सैफ काळजी घेतो." करीना ही तिच्या सोशल मीडिया अकाऊंटवर तैमुरचे आणि तिचे इतर खासगी फोटो शेअर करत असते. ऑक्टोबर २०१२ मध्ये सैफ आणि करीनाने लग्न केलं, त्यानंतर २०१६ मध्ये तैमुरचा आणि २०२१ मध्ये जेहचा जन्म झाला. करीना नुकतीच आमिरबरोबर चित्रपटात झळकली. याबरोबरच तिच्या पहिल्या ओटीटी प्रोजेक्टचे चित्रीकरणसुद्धा पूर्ण झाले आहे. हा चित्रपट सुजॉय घोष दिग्दर्शित करत असून तो एका जॅपनीज कादंबरीवर बेतलेला आहे. करीनाबरोबर यामध्ये जयदिप अहलावत आणि विजय वर्मा हे कलाकार मुख्य भूमिकेत दिसणार आहेत.

# 'भाबीजी घर पर हैं' फेम सौम्या टंडनची दीपेश भानच्या कुटुंबाला मदत




'भाबीजी घर पर हैं' या लोकप्रिय कॉमेडी शोचा अभिनेता दीपेश भानच्या अचानक मृत्यूनं सर्वत्र शोककळा पसरली होती. त्याच्या अचानक जाण्याने कुटुंबियांना मोठा धक्काच बसला होता. दीपेश भान गेल्यानंतर त्याच्यावर असलेल्या कर्जाची जबाबदारी कुटुंबावर आली. मात्र, आता त्याच्या कुटुंबियांनी ५० लाखांचं कर्ज फेडल्याचे समोर आले आहे. यासाठी 'भाबीजी घर पर हैं' अभिनेत्री सोम्या टंडनने त्याच्या कुटुंबाला मदत केली आहे.

# अमिताभ बच्चन- रश्मिका मंदाना यांच्या 'गुडबाय'चा ट्रेलर प्रदर्शित, पाहा व्हिडीओ

बिग बी अमिताभ बच्चन यांचा 'केबीसी' अर्थात 'कौन बनेगा करोडपती' हा कार्यक्रम काही दिवसांपूर्वी सुरू झाला होता. दरम्यानच्या काळात त्यांना करोनाची लागण झाली. करोनामुळे कार्यक्रमाचे चित्रीकरण काही दिवसांसाठी थांबले. त्यांच्यामुळे इतर कोणाला करोनाचा संसर्ग होऊ नये म्हणून त्यांना विलगीकरणात राहावे लागले. ते या वयातही नव्या गोष्टी शिकत असतात. विलगीकरणात राहत असताना अमिताभ सोशल मीडियाद्वारे त्यांची खुशाली चाहत्यांपर्यंत कळवत होते. ते सोशल मीडियावर खूप सक्रीय आहेत. अमिताभ यांनी नुकताच त्यांच्या 'गुडबाय' आगामी चित्रपटाचा ट्रेलर सोशल मीडियावर शेअर केला आहे. अमिताभ यांचा 'गुडबाय' हा चित्रपट पुढच्या महिन्यामध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटामध्ये त्यांच्यासह नीना गुप्ता, रश्मिका मंदाना आणि पावैल गुलाटी असे कलाकार दिसणार आहेत. दाक्षिणात्य अभिनेत्री 'रश्मिका मंदाना' या चित्रपटाच्या माध्यमातून हिंदी चित्रपटसृष्टी म्हणजेच बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. तसेच या चित्रपटामध्ये सुनील ग्रोव्हर, एली अवराम, साहिल मेहता, अभिषेक खान यांनी सहाय्यक व्यक्तिरेखा साकारल्या आहेत. विकास बहल यांनी गुडबाय चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. काही दिवसांपूर्वी चित्रपटाचे पोस्टर्स सोशल मीडियावर पोस्ट करण्यात आले होते.




# 'लायगर'मुळे विजय देवरकोंडाला मोठा फटका,



'लायगर'मुळे विजय देवरकोंडाला मोठा फटका, 'या' चित्रपटाचं शूटिंग झालं कायमस्वरूपी बंद 'लायगर'चे दिग्दर्शक जगन्नाथ पुरीचं या चित्रपटाचे दिग्दर्शन करणार होते. बॉलिवूड अभिनेत्री अनन्या पांडे आणि विजय देवरकोंडा यांच्या 'लायगर' चित्रपटाची गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर जोरदार चर्चा आहे. अखेरीस हा चित्रपट आता प्रदर्शित झाला आहे. बॉयकॉट ट्रेंडमुळे चित्रपटाला फटका बसणार का? हा प्रश्न उपस्थित केला जात होता. प्रत्यक्षात मात्र असंच काहीसं घडताना दिसत आहे. अनन्याची या चित्रपटामधील भूमिका पाहून नेटकऱ्यांनी तिची खिल्ली उडवली. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवरही फ्लॉप ठरला. या चित्रपटामुळे विजय देवरकोंडाला मात्र मोठा फटका बसला आहे.विजय देवरकोंडाचा चाहतावर्ग फार मोठा आहे. 'लायगर'ला मिळालेल्या अपयशामुळे त्याला मात्र नुकसान सहन करावं लागत आहे. हिंदुस्तान टाइम्सच्या वृत्तानुसार, विजयचा आगामी चित्रपट 'जन गण मन'चं काम आता पूर्णपणे बंद पडलं आहे

## शॉर्ट न्यूज »

### "...तर आशिया चषक स्पर्धेत पाकिस्तान ठरू शकतो चॅम्पियन,"

आशिया । महाईन्यूज

सध्या आशिया चषक स्पर्धेची धूम आहे. यूएईमध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेमध्ये सुपर-४ फेरीतील सामने खेळवले जात आहेत.४ सप्टेंबर रोजी पाकिस्तानने केलेल्या पराभवामुळे टीम इंडियासमोर 'करो या मरो'ची स्थिती निर्माण झाली आहे. आज (६सप्टेंबर) भारत-श्रीलंका या सामन्यात भारताला विजय मिळवणे गरजेचे आहे. या सामन्यात पराभव झाल्यास भारताचे आव्हान संपुष्टात येईल. हीच बाब लक्षात घेऊन भारताचा माजी क्रिकेटपटू विरेंद्र सेहवाग याने मोठे विधान केले आहे. आशिय चषक स्पर्धेत पाकिस्तान जेतेपद पटकावू शकतो, असा अंदाज सेहवागने व्यक्त केला आहे.

क्रिकबझ या क्रीडाविषयक माहिती देणाऱ्या संकेतस्थळाने याबाबत माहिती दिली आहे. "आणखी एका सामन्यात पराभव झाल्यास भारताचे आव्हान संपुष्टात येईल.

पाकिस्तानने एक सामना जिंकलेला आहे तर एकात त्यांचा पराभव झालेला आहे. आणखी एक सामना जिंकला तर पाकिस्तान थेट अंतिम फेरीत धडक मारेल.

# श्रीलंकेची थेट फायनलमध्ये धडक!

## 6 गडी राखून भारतावर मिळवला विजय

।नवी दिल्ली। महाईन्यूज ।




यूएईमध्ये सुरू असलेल्या आशिया चषक स्पर्धेमध्ये सुपर-४ फेरीत भारत आणि श्रीलंका यांच्यात सामना झाला. दोन्ही संघ तूल्यबळ असल्यामुळे शेवटच्या षटकापर्यंत अटीतटीची लढत झाली. मात्र या सामन्यात श्रीलंकेचा सहा गडी राखून विजय झाला. भारताने सुरुवातीला फलंदाजीसाठी येत श्रीलंकेसमोर विजयासाठी १७४ धावांचे लक्ष्य ठेवले होते. सुरुवातीपासूनच आक्रमक फलंदाजी केल्यामुळे श्रीलंकेने ही धावसंख्या कुशलतेने गाठली. श्रीलंकेच्या विजयामागे निसंका आणि मेंडिस या जोडीने अर्धशतकी खेळी महत्त्वाची ठरली.

भारताने दिलेल्या १७४ धावांचे लक्ष्य गाठण्यासाठी आलेल्या श्रीलंकेच्या पथुम निसांका (५२) आणि कुशल मेंडिस (५७) यांनी नेत्रदीपक कामगिरी केली. दोघांनीही अर्धशतकी खेळी केल्यामुळे ११ षटकापर्यंत श्रीलंका संघ अतिशय चांगल्या स्थितीत होता. मात्र अवघ्या ९७ पासून ११० धावावर येईपर्यंत श्रीलंकेचे तब्बल चार गडी बाद झाले. चरित असलंका (०), दानुष्का गुनाथिलका (१) खास कमाल दाखवू शकले नाहीत. भानुका राजपक्षे आणि दासून शनाका शेवटपर्यंत नाबाद राहिले. शेवटच्या ५ चेंडूंमध्ये ६ धावांची गरज असताना या दोघांनी कुशलतेने फलंदाजी केली. राजपक्षेने (नाबाद) २५ तर दासून (नाबाद) ३३ धावा केल्या. याआधी नाणेफेक जिंकून श्रीलंकेने सुरुवातीला गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर फंलादाजीसाठी आलेल्या भारताची सुरुवात खराब झाली. दुसऱ्याच षटकात केएल राहुल अवघ्या सहा धावांवर बाद झाला. त्यानंतर दुसऱ्या विकेटसाठी आलेल्या विराट कोहलीनेदेखील निराशा केली. तो खातंही खोलू शकला नाही. मात्र रोहित शर्माने कर्णधार म्हणून आपली भूमिका चोखपणे पार पाडली. त्याने ४१ चेंडूंमध्ये चार षटकार आणि ५ चौकार लगावत ७२ धावा केल्या.



# सुरेश रैनाची क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा

।नवी दिल्ली।महाईन्यूज ।

भारताचा क्रिकेटपटू सुरेश रैनाने मोठा निर्णय घेत क्रिकेटच्या सर्व प्रकारांमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. निवृत्तीचा निर्णय जाहीर करताना त्यांनी देशाचं आणि उत्तर प्रदेशचं प्रतिनिधित्व करणं अभिमानास्पद होतं, असं म्हटलं. "माझ्या क्षमतेवर विश्वास दाखवणाऱ्या आणि पाठिंबा देणाऱ्या सर्वांचे आभार," असं म्हणत त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

सुरेश रैना म्हणाला, "माझ्या देशाचं आणि उत्तर प्रदेश राज्याचं प्रतिनिधित्व करणं अभिमानास्पद होतं. मी क्रिकेटच्या सर्व प्रकारातून निवृत्ती घेत आहे. मी बीसीसीआय, उत्तर प्रदेश क्रिकेट असोसिएशन, चेन्नई सुपर किंग्ज, राजीव शुक्ला आणि माझ्या सर्व चाहत्यांचे मी आभार मानतो."

या सर्वांनी माझ्या क्षमतेवर विश्वास दाखवला आणि खूप पाठिंबा दिला," असंही सुरेश रैनाने नमूद केलं. क्रिकेटच्या सर्व प्रकारातून निवृत्तीची घोषणा केली असली तरी सुरेश सैना १० सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या रोड सेफ्टी सीरिजमध्ये खेळणार आहे. सुरेश रैनाने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून याआधीच निवृत्ती जाहीर केली आहे. १५ ऑगस्ट २०२० रोजी एम. एस. धोनीने निवृत्तीची घोषणा केल्यानंतर एका तासात रैनानेही निवृत्तीचा निर्णय जाहीर केला होता. रैना २०११ च्या विश्वचषकात धोनीच्या नेतृत्वातील विजेत्या संघाचा भाग होता. रैनाने आतापर्यंत १८ कसोटी, २२६ एकदिवसीय आणि ७८ टी-२० सामन्यांमध्ये भारताचं प्रतिनिधित्व केलं आहे. तो १३ वर्षे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये खेळला. सुरेश रैनाने २२६ एकदिवसीय सामन्यांमध्ये एकूण ५,६१५ धावा काढल्या. तसेच ७८ कसोटी सामन्यांमध्ये एकूण १,६०५ धावा केल्या.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही